**ठळक बातम्या**

- तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व किमान हमीभावाने खरेदी करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- चहा निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीत भारताला दुसरं स्थान

- आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे बालमृत्यू रोखण्यासाठी भारताने केलेल्या प्रयत्नांची संयुक्त राष्ट्रांकडून प्रशंसा

- इस्त्रायली सैन्याने गाझापट्ट्यात हवाई आणि जमिनीवरचे हल्ले वाढवले

**आणि**

- आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबादची लढत लखनऊ सुपर जायंट्स संघाबरोबर

**<><><><><>**

तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत कृषी भवन इथं पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. याकरता शेतकऱ्यांना नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. शेतकऱ्यांना तूर, मसूर आणि उडदाचा योग्य भाव  मिळावा याकरता राज्यसरकारांनी प्रभावी आणि पारदर्शी खरेदी पद्धत राबवावी असं आवाहन त्यांनी केलं…

**होल्ड- बाईट - कृषीमंत्री...**

येत्या ४ वर्षात या अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करण्याचं उद्दिष्ट अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आलं आहे. केंद्रसरकारने चालू रबी हंगामात ३७ लाख ३९ हजार टन कडधान्यांच्या तर २८ लाख २८ हजार टन राईच्या खरेदीला मान्यता दिली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. खरीपातली तूर खरेदी २ लाख ४६ हजार टन पर्यंत झाली असून त्याचा फायदा १ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र, गुजरात,आंध्र प्रदेश, तेलंगण,आणि कर्नाटकमधे हमीभावाने खरेदी सुरु असून कर्नाटकात खरेदीची मुदत १ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**<><><><><>**

चहा निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीत भारताने दुसरं स्थान मिळवलं आहे. भारतीय चहा बोर्डाने प्रसिद्ध केलेली आकडेवारी सांगते की, गेल्या वर्षभरात भारताने २५कोटी ५० लाख टन चहाची निर्यात केली, जो गेल्या १० वर्षातला उच्चांक आहे. या निर्यात वाढीमुळे भारताने श्रीलंकेला मागं टाकलं असून एकूण निर्यातीत १० टक्के वाटा भारताचा आहे. पहिल्या स्थानावर केनिया आहे. जगातल्या २५ देशांमधे भारतातून चहा निर्यात केला जातो. त्यात अंयुक्त अरब अमिराती, इराक, इराण, रशिया, अमेरिका आणि युके हे महत्त्वाचे खरेदीदार आहेत.

भारतातला आसाम, दार्जिलिंग आणि नीलगिरीत पिकणारा चहा जगातल्या सर्वोच्च दर्जात गणला जातो. चहाउत्पादन वाढीसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या असून या क्षेत्रात सुमारे साडे अकरा ११ लाख जणांना थेट रोजगार मिळतो. तर संबंधित क्षेत्रात तेवढेच रोजगार उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरुद्धचा हक्कभंग प्रस्ताव राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आज फेटाळून लावला. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्याविरुद्ध अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी या प्रस्तावाची नोटीस दिली होती. २५ मार्च  रोजी राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन विधेयकावर बोलताना शहा यांनी ही टिप्पणी केली  होती. या विधानात आपल्याला मर्यादांचं उल्लंघन आढळलं नाही असं धनखड यांनी सांगितलं. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सदस्यांच्या वर्तनासाठी नवे मार्गदर्शन तत्वं जारी करायला  इथिक्स कमिटीला सांगितलं आहे.

**<><><><><>**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संघटना आणि भारतीय नौदलाने काल ओदिशाच्या किनाऱ्यावर चंडीपूर इथे जमिनीवरुन आकाशात मारा करणाऱ्या लहान पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी केली. हे क्षेपणास्त्र जमिनीवरून आकाशात कमी उंचीवरच्या लक्ष्याचा भेद करू शकतं. या क्षेपणास्त्राची प्रणाली भारतातच विकसित झाली असून यात रेडिओ फ्रिक्वेन्सी सीकर, मल्टी फंक्शन रडार आणि वेपन कंट्रोल सिस्टिम बसवण्यात आले आहेत. या यशस्वी चाचणीसाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी डीआरडीओ आणि भारतीय नौदलाचं अभिनंदन केलं आहे. ही प्रणाली संरक्षण संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रातल्या भारताच्या क्षमतेचा पुरावा असल्याचंही ते म्हणाले आहेत.

**<><><><><>**

जागतिक रंगभूमी दिन आज साजरा होत आहे. १९६१ मध्ये 'युनेस्को'च्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिटट्यूटने या दिवसाची सुरुवात केली. पहिला जागतिक रंगभूमी दिन १९६२ मध्ये साजरा झाला. त्यानंतर दरवर्षी या दिवशी विविध कार्यक्रम आणि उपक्रमांद्वारे हा दिन उत्साहाने साजरा होतो.

**<><><><><>**

आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे भारताने बालमृत्यू रोखण्यासाठी केलेले प्रयत्न अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार संयुक्त राष्ट्रांनी एका अहवालात काढले आहेत. आरोग्य क्षेत्रात धोरणात्मक गुंतवणूक करून भारताने लाखो बालकांचे प्राण वाचवल्याचं या अहवालात म्हटलं आहे. भारताने २००० पासून पाच वर्षांखालच्या बालकांच्या मृत्यूदरात ७० टक्के आणि नवजात बालकांच्या मृत्यूदरात ६१ टक्के घट करण्यात यश मिळवलं आहे. यासाठी आरोग्य सुविधांची व्याप्ती वाढवण्यात आली, पायाभूत सुविधा आणि संसाधनाच्या विकासासाठी उपाययोजना केल्या गेल्या असंही यात म्हटलं आहे. यासाठी संयुक्त राष्ट्रांनी आयुष्मान भारत योजनेचा दाखला दिला. या योजने अंतर्गत प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी साडे पाच हजार अमेरिकन डॉलरचं संरक्षण दिलं जातं असं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

एल्गार परिषद हिंसाचार प्रकरणात अटकेत असलेले वकील सुरेंद्र गडलिंग आणि सामाजिक कार्यकर्त्या ज्योती जगताप यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने दोन आठवडे पुढे ढकलली आहे. महेश राऊत यांच्या जामीन अर्जाला आव्हान देणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या याचिकेवरील सुनावणीही न्यायालयाने पुढे ढकलली आहे. महेश राऊत यांना

मुंबई उच्च न्यायालयाने जामीन दिला होता, मात्र एनआयएने याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर या निर्णयाला स्थिगीती देण्यात  आली आहे.

**<><><><><>**

इस्रायली सैन्याने गाझापट्ट्यात हवाई आणि जमिनीवरचे हल्ले वाढवले असून १८ मार्चपासून ते आजपर्यंत ४३०हून अधिक ठिकाणांवर हल्ले झाल्याचं हमासच्या अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. या हल्ल्यांमुळे दोन महिन्यांच्या युद्धबंदी कराराचं उल्लंघन झाल्याचंही हमासने म्हटलं आहे. या हल्ल्यांमध्ये सुमारे ८३० जणांचा मृत्यू झाल्याचं गाझाच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं असून या काळात कोणत्याही इस्रायली नागरिकाच्या मृत्युची नोंद नसल्याचंही म्हटलं आहे. इस्रायलनेही गाझापट्ट्यातून येणारी १४ क्षेपणास्त्र रोखल्याची माहिती दिली असून त्यात येमेनमधून सहा, लेबनॉनमधून तीन आणि गाझा पट्ट्यातून आलेल्या पाच क्षेपणास्त्रांचा समावेश आहे, असं इस्रायलच्या अधिकृत सूत्रांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

हमास आणि इस्राइल यांच्यात सुरू असलेल युद्ध तत्काळ थांबवावं या मागणीसाठी काल शेकडो पॅ लेस्टाईन नागरिकांनी गाजा पट्टीच्या उत्तर भागात निदर्शने केली. हातात युद्धाच्या विरुद्ध फलक झळकवत आणि घोषणा देत त्यांनी ही निदर्शने केली. गेले 17 महीने चाललेल्या या युद्धमुळे गाजा पट्टी पूर्णतः उद्ध्वस्त  झाली आहे. इस्राइलने आपल्या बंधकांना मुक्त करण्यासाठी हमासवर दबाव आणण्यासाठी या महिन्याच्या 2 तारखेपासून

इस्त्राइलने सर्व प्रकारच साहाय्य बंद केल असून त्यामुळे  नागरिकांची स्थिति अधिक गंभीर झाली आहे.

**<><><><><>**

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद संघाचा सामना लखनऊ सुपर जायंट्स संघाबरोबर होणार आहे. हैदराबाद इथे राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये आज संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

काल झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघाने राजस्थान रॉयल्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. राजस्थान रॉयल्सने प्रथम फलंदाजी करत कोलकाता संघाला १५२ धावांचं आव्हान दिलं होतं. हे आव्हान कोलकाता संघाने २ गड्यांच्या मोबदल्यात १७ षटकं आणि ३ चेंडूंत पूर्ण केलं. कोलकाता नाईट रायडर्ससडून क्विंटन डीकॉक याने नाबाद ९७ धावांची खेळी केली.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या महाड औद्योगिक वसाहतीत अंमली पदार्थांचं उत्पादन करणारा एक कारखाना राष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी पथकानं उघडकीस आणला असून या कारखान्यातून ४७ किलो अंमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी दोघांना मुंबईच्या भांडूप भागातून २२ मार्च रोजी ताब्यात घेतल्याची माहिती पथकानं दिली. हे दोघे सध्या जामीनावर बाहेर असल्याचंही पथकानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या नागरीकांना त्यांच्या घरापासून पाच किलोमीटरच्या परिसरातच उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. राज्याच्या आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. आरोग्य विभागाच्या जास्तीत जास्त योजना आणि आरोग्य सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात याव्यात यासाठी सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा महामंडळाची स्थापना करण्यासंदर्भातला प्रस्ताव सादर करुन आरोग्य क्षेत्रातल्या सुविधा अत्याधुनिक दर्जाच्या उभाराव्यात, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

//<><><><><>//